आयडीए.37 / 2018

(CNR No.MHLC340001302018)

अमोल बोधळे – विरूध्द – गुप्ता एनर्जी प्रा.ली.

आदेश नि.क्र.यु–1

(पारीत दि.07.12.2021)

अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की प्रस्तुत प्रकरण हे सन – 2018 चे असुन अर्जदार यांना योग्य संधी दिल्यानंतरही हमदस्त नोटीस घेण्यास हजर नव्हते. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार सतत गैरहजर असल्याचे दिसुन आले. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये दि.17.11.2021 ला आदेश पारीत होवुन सदरचे प्रकरण खारीज आदेशाकरीता लावण्यात आले. त्यानंतर असे दिसुन येते की दि.27.11.2021 ला सुध्दा नोटीस हमदस्तचा अर्ज नि.क्र.यु–8 वर दिला होता व त्या अर्जावर न चुकता हमदस्त घेण्यात यावा व नोटीस पोच पुढल्या तारखेस देण्याचा आदेश न्यायालयाने पारीत केला होता. परंतु सदरचा आदेश पारीत झाल्यानंतरही अर्जदाराने हमदस्त नोटीस तयार असतांना सुध्दा घेवुन जाण्यास असमर्थता दिसुन आल्यामुळे असा निष्कर्ष काढण्यात येतो की अर्जदार हा प्रकरण चालविण्यास ईच्छुक नसल्यामुळे विनाकारण प्रकरण प्रलंबित ठेवणे योग्य होणार नाही. करीता प्रकरण खारीज करण्यात येते.

( श्रीमती रू.वि. मेटे )
न्यायाधीश.
कामगार न्यायालय, चंद्रपुर

चंद्रपुर.
दिनांक : 07.12.2021.

LABOUR COURT